
## डॉ. स्मिता दामले



# वसई वीरांचा विजय

## डॉ. स्मिता दामले

ई साहित्य प्रतिष्ठान

# वसई वीरांचा विजय

डॉ. स्मिता दामले

4212, fishermans Pier Court,

Lutz,

Florida, 33558.

U.S.A.

Emails:

suhasdamle341@hotmail.com

suhas.smita48@gmail.com

Mobile: 9867364634

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

# प्रकाशक :ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

eSahity Pratishthan

eleventh floor

eternity

eastern express highway

Thane.

Whatsapp- 9987737237

(विनामूल्य पुस्तकांसाठी आपले नाव व गाव कळवा)

**प्रकाशन :१७ डिसेंबर २०२३ (वीर चिमाजी अप्पा स्मृतीदिन)**



©esahity Pratishthan®2023

• विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

• आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

• हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापूर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.

# डॉ. स्मिता दामले



ई साहित्यतर्फ़े आज डॉ. स्मिता दामले यांचे बारावे पुस्तक, “वसई वीरांचा विजय” प्रकाशित होत आहे.

ई साहित्य प्रतिष्ठान हा अनेक कवी व लेखकांनी सुरू केलेला एक नवीन प्रयोग. मराठी मध्ये वाचक आणि साहित्यिक अधिक जवळ यावेत आणि एक मोठी चळवळ इंटरनेटच्या माध्यमातून सुरू व्हावी अशी इच्छा होती. मराठी भाषेत उत्तम दर्जेदार साहित्य निर्मिती व्हावी, चांगले वाचक एकत्र यावेत, त्यांना चांगल्या दर्जाचे साहित्य मिळावे आणि दर्जेदार लिहू इच्छिणाऱ्या लेखकांना असे वाचक मिळावेत. एवढेच काय ते आमचे छोटेसे स्वप्न. हिंमते मर्दा. मददे खुदा. आमच्या छोट्याशा स्वप्नाला लाखो वाचकांची आणि दर्जेदार लेखकांची साथ मिळत गेली आणि कारवां बनता गया. डॉ. स्मिता दामले या त्यातीलच एक. “सुर्यपुत्र लोकमान्य” हे लोकमान्य टिळकांचे एक वेगळ्या अंगाचे, त्यांच्या मानवी कंगोऱ्यांचे दर्शन घडवणारे चरित्र, “रक्षा” हा रक्षा या शब्दाच्या विविध सात अर्थांतून निर्माण होणाऱ्या कथांच्या संग्रहाबरोबरच त्यांचा काचांची नक्षी हाही कथा संग्रह वाचकांना आवडला. त्यांनी “कलाटणी" हे भारताच्या हजारो वर्षांच्या भव्य इतिहासाचे मिनिएचर दर्शन घडवणारे पुस्तक लिहीले. अशा पुस्तकांनी ई साहित्य चे पुस्तक संग्रहालय समृद्ध होत आहे. त्यांचे “मनसोक्त”

हे वर्तमानपत्रातील बातम्या वाचल्यानंतर उमटलेल्या तरंगांचे पुस्तक हे. ई साहित्य तर्फे डॉ. स्मिता दामले यांचे हे चौथे पुस्तक. पाचवे पुस्तक होते “इतिहासाची विलग पाने”. इतिहासातील काही महत्त्वाच्या पण कमी प्रसिद्ध अशा घटना व व्यक्तींभोवती हे पुस्तक आहे. पाचही पुस्तके वेगवेगळी आणि तरीही एकाच धाग्यातली. तो धागा म्हणजे इतिहास. आणि त्यातली फ़ुले मात्र दुर्मिळ, अप्रसिद्ध व्यक्ती आणि घटना. सल्तनत ए दिल्ली हे सहावे पुस्तकही याला अपवाद नाही. त्यांचे आठवे पुस्तक कावेरीचा दुभंग: लाही वाचकांचा उदंड प्रतिसाद मिळाला.

डॉ स्मिता दामले यांना राजकारणाची आवड असल्यामुळे आजवर इतिहासाचा अभ्यास करून त्यातच लेखन केलं. इतिहास म्हणजे पूर्वकालीन सत्ताधीशांच्या यशापयाशाची कहाणी. इतिहास विषयातच त्यांनी Ph.D केलं. इतिहास वाचत असताना त्यांच्या एक गोष्ट लक्षात आली, ती म्हणजे १७ व्या आणि १८ व्या शतकातील उत्तर भारतातील राजकारणावर आणि शिंदे-होळकर-मोगल आणि थोरले बाजीराव यांच्यातील सत्तेच्या रस्सिखेचावर विपुल लेखन लिहिलं गेलं आहे. पण १८ व्या शतकात दक्षिण भारतात मोठं राजकारण खेळणाऱ्या संभाजी पुत्र शाहू, पेशवाईचे संस्थापक बाळाजी विश्वनाथ, हैदर अली, त्याचा पुत्र टिपू सुलतान आणि या सर्वांचा लढा झाला त्या प्रबळ इंग्रजांवर मराठीत लेखन झालेलं नाही. म्हणून मनोव्यापाराच्या आधाराने, कादंबरी अंगाने, इतिहास मांडणारं लेखन त्यांनी अभ्यासपुर्वक केलं. ते लेखन म्हणजे, शिवरायांच्या पश्चात संभाजी-राजाराम-शाहू या त्यांच्या तीन वारसांचा आणि पेशवाई शतकाची स्थापना करणाऱ्या बाळाजी विश्वनाथ- पुत्र

बाजीराव - आणि नानासाहेब पेशवा यांच्या कारकीर्दीचा, बाजीरावांच्या मातोश्री राधाबाई ज्यांनी ७५ वर्षांचं दीर्घायुष्य मिळाल्यामुळे राजकारण फार जवळून पाहिलं त्यांना नायिका करून इतिहास सांगणारी "मातोश्री" ही कादंबरी. त्यानंतर त्यांनी मिरजेचे सरदार पटवर्धन यांच्या घराण्याचा इतिहास मांडणारी " उदयास्त " ही कादंबरी लिहीली. त्यांनी लिहीलेलं " मी टिपू सुलतान " हे टिपू सुलतानचं राजकीय, व्यक्तिगत चरित्र प्रसिध्द आहे.

"असं घडलं होतं" व "अस्ताचलावरील तारे" या नवव्या ४५० पानी व दहाव्या दोनशे पानी पुस्तकात त्यांनी भारताच्या पारतंत्र्याच्या ग्रहण दशेतलं वास्तव मांडलं आहे. ७५० वर्षांच्या साडेसातीतून हे राष्ट्र कसं बाहेर पडलं याचा हा इतिहास आहे. युगानुयुगे, शतकानुशतके, सर्वांना यातून काय घडलं होतं, का घडलं होतं आणि असं घडलं होतं, हे सांगण्याचा हा प्रयत्न आहे.

ई साहित्य ही संस्था कोणतेही धन देत नसताना त्यांनी आपली बारा मौल्यवान पुस्तकं ई साहित्यच्या वाचकांसाठी विनामूल्य दिली ही आमच्यासाठी डॉ. स्मिता दामलेंची खरी ओळख.

ई साहित्य प्रतिष्ठान डॉ. स्मिता दामले यांचे कायम ऋणी राहील.

**टीम ई साहित्य**

# वसई वीरांचा विजय

**डॉ. स्मिता दामले.**

suhasdamle341@hotmail.com

suhas.smita48@gmail.com

१७ डिसेंबर १७४०.

वीर चिमाजीआपांच्या पुण्य स्मृतीस अर्पण.

# वसई वीरांचा विजय ...

वसईतील वीरांच्या २५ / ३० वर्षांच्या अथक, चिवट ध्यासाची,

पेशवे बाजीराव आणि चिमाजीआपांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या लढ्याची,

२०० वर्षे ठाण मांडून राहिलेल्या फिरंग्यांवरील

फत्तेची  अभूतपूर्व यशोगाथा.

वसईचा सुवर्ण विजय.

वसईचा विजय हा पोर्तुगीझांवरील मराठ्यांच्या अतुलनीय पराक्रमाचा, चिवट झुंजीचा, कणखर नेतृत्त्वाचा आणि अप्रतिम जिद्दीचा अभिमानास्पद इतिहास आहे. दीव-दमण-वसई-तारापूर-वेसावे-अर्नाळा-माहीम-साष्टी-धारावी या समुद्राच्या पाण्याने वेढलेल्या बेटांना हजार वर्षांचा प्राचीन इतिहास आहे. राजवाडे यांच्या " महिकावतीची बखर, आणि " नारायण माडगावकर यांच्या " मुंबईचे वर्णन " या पुस्तकात यांनी मुंबईसकट सर्व बेटांचा पूर्व काल वर्णन केला आहे.. मुंबई आणि साष्टी, माहीमच्या भोंगळे सरदारांच्या हाताखाली होती. या पाण्याने वेढलेल्या मुंबईच्या लहान लहान बेटांवर, कोळी, भंडारी, प्रभू, पाचकळशी, सुतार, वाडवळ, जोशी यांची मोठी वस्ती होती. हे लोक भातशेती करून राहात. पायधुणी – जिथे आजूबाजूच्या खेड्यातील मचव्यातून आलेले लोक पाय धुवून गावात शिरत. भेंडी बाजार – याचा मूळ शब्द behind बाजार असा होता. कारण मुख्य बाजारानंतर मुसलमानांची इथे वस्ती होती. तो मग भेंडी बाजार अपभ्रंश झाला. अशी ही वस्ती आणि खेडी समुद्रालागत होती.

सन ११३८ मध्ये चंपानेरचा राजा गोवर्धनबिंब याचा भाऊ प्रतापबिंब हा उत्तर कोकणच्या स्वारीवर निघाला. पैठण-जुन्नर मार्गे तो फौज घेऊन दमणवर उतरला आणि तिथल्या राजाचा पराभव करून त्याने पश्चिम

किनाऱ्यावरील माहीम म्हणजे त्याकाळची महिकावती नगरीला आपली राजधानी केली. मग आपला मंत्री बाळकृष्ण सोमवंशी याला साष्टी बेट जिंकायला पाठवलं.. याने साष्टीचा राजा यशवंत शिलाहार, कळव्याचा कोकाटे, यांचा मुलुख ताब्यात घेऊन तो वाळकेश्वरपर्यंत एकेक बेट जिंकत गेला. त्यामुळे प्रतापबिंब याच्या हाताखाली दमण ते वाळकेश्वरपर्यंतचा ८४ मैलांचा मुलुख आला. प्रतापबिंब ९ वर्षे सत्तेत होता. त्याच्या शत्रूंनी त्याचा पराभव केला तेव्हा तो साष्टीत जाऊन राहिला. आपली महिकावती राजधानी हातची गेल्यावर, त्याने वांद्रे बेटाजवळ माहीम नावाची नवीन राजधानी निर्माण केली.

त्यानंतर त्याचा मुलगा महीबिंब गादीवर आला. त्याने ६५ वर्षे राज्य केलं. हे घराणं १०० वर्षे सत्तेत राहिलं. पुढे अल्लाउद्दीन खिलजीने देवगिरीच्या राजाचा पराभव करून राज्य जिंकलं. तेव्हा रामदेवरायचा मुलगा बिंबदेव उदगीर इथे कारभार करत होता, त्याने गुजराथपासून दक्षिणेपर्यंत सर्व मुलूख मिळवून आपलं राज्य स्थापन केलं. त्याचा मुलगा प्रतापशा याचा पराभव त्याचा चेऊलचा सरदार नागरशा याने केला. या नागरशाने लढाईच्या वेळी कबूल केलेली बक्षिसे आपल्या लोकांना दिली नाहीत, तेव्हा त्या नाराज सरदारांनी, शेवटचा हिंदू राजा नागरशा याचा पराभव महंमद तुघलखाचा वडनगरचा सरदार कुणी मलिक नावाचा होता, त्याला बोलावून त्याच्या हाताने पराभव करवला. तेव्हापासून सबंध कोकणवर मुसलमानी अंमल सुरू झाला.

यानंतर अहमदाबादच्या सुलतानाची सत्ता सुरू झाली. या अहमदाबादच्या सुलतानांपैकी महंमद शहा बेगडा जेव्हा सत्तेत होता तेव्हा सन १५०० मध्ये २ गलबते भरून पोर्तुगीझ दक्षिण किनाऱ्यावर पोचले. सन १५१२

मध्ये, काही पोर्तुगीझ त्याच्याकडे आले आणि त्यांनी आपली फेतोरी म्हणजे फॅक्टरी उघाडली. नंतर या पोर्तुगीझांनी हातपाय पसरायला सुरुवात केली. त्यांनी दमण जिंकून घेतलं, चौलमध्ये फॅक्टरी उघडायच्या निमित्ताने शिरले आणि तेही बळकावलं. सन १५३१ मध्ये तिथे बळकट किल्ला बांधला. त्याच साली सन १५३१ मध्ये ३००० पोर्तुगीझ १५० गलबतांमधून आले आणि त्यांनी वसई किल्ल्यावर हल्ला केला. त्यावेळी तिथे १२००० लोक होते, त्यांचं काहीही चाललं नाही. पोर्तुगीझांनी किल्ला पडून टाकला आणि नव्याने बांधला. मग दीव जिंकलं हा प्राचीन इतिहास या सर्व बेटांचा होता. असा या पोर्तुगीझांचा कोकण किनाऱ्यावर अंमल बसला. याला कारण त्यांच्या युद्धसहित्यात तोफा होत्या. त्या तोफांपुढे आपल्या लोकांचा काहीही उपाय चालला नाही.

## मराठे आणि वसई.

पेशवे बाजीराव यांचे धाकटे बंधू, बाजीरावांना प्रत्येक मोहिमेत साथ देणारे, पोर्तुगीझांचं स्वराज्यातून संपूर्ण उच्चाटन आणि हिंदू धर्माची वसईत स्थापना करणारे चिमाजीआपा आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी मिळवलेला वसईवरचा अभूतपूर्व विजय हा शाहूमहाराजांच्या आणि मराठ्यांच्या इतिहासातील सुवर्ण विजय. २४ मार्च १७३७ ला सुरू झालेला हा लढा, १ मे १७३९ ला वसईवरचा निकराचा हल्ला, ५ मेला तह आणि १२ मे या दिवशी वसई स्वराज्यात दाखल असा हा संग्राम घडला. ३ वर्षे मराठे वसई मुक्तीसाठी झुंजले. अनेकांनी प्राणाहुती दिली.  सन १५३३ सालापासून अरबी समुद्रावर

हुकमत गाजवणारे, धर्म आणि व्यापाराच्या नावाखाली हिंदूंचा अतिरेकी छळ करणारे फिरंगी पोर्तुगीझ, २०० वर्षांनी कोकण किनारा सोडून पराभूत होऊन गेले. हा ऐतिहासिक विजय चिमाजीआपांच्या चिवट आणि उत्तम रणनीतीमुळे, पराक्रमामुळे घडून आला.

दक्षिणेला गोवा आणि उत्तरेला दीव-दमण हे दोन सागरी मार्ग पोर्तुगीझांनी आपल्या ताब्यात ठेवले. तेव्हा वसई हे त्याचं मुख्य ठिकाण होतं. इ. स. १६०० सालात इंग्लंडमध्ये ईस्ट इंडिया कंपनी स्थापन झाल्यावर मुंबई हे इंग्रजांचं भारतातील व्यापाराचं आणि दळणवळणाचं मुख्य केंद्र बनलं.. अशारीतीने इंग्रज, पोर्तुगीझ, आणि जंजीऱ्याचा सरदार सिद्दी या तीन परकियांशी मराठ्यांना सतत सामना करावा लागला.

**पोर्तुगीझांचा धर्मप्रसारासाठी छळ** –

व्यापारासाठी आलेल्या पोर्तुगीझांनी धर्मप्रसाराला जास्त महत्त्व दिलं. त्या २०० वर्षांच्या सत्ता काळात, त्यांनी गोवा दमण वसईतील हिंदूंवर धर्मांतराची सक्ती, आणि आर्थिक छळ अशी कोंडी करायला सुरुवात केली. जे ऐकणार नाहीत, त्यांना ठार करून फिरंगाण सुरू केलं आणि दहशत बसवली. हिंदूंना मंदिरं बांधण्याची परवानगी नव्हती. हिंदू धर्माचं उच्चाटन करण्यासाठी हिंदूंचा छळ सुरू केला. वसईच्या प्रत्येक गावाकडून खंडणी देण्याची सक्ती सुरू केली. सन १७०५ मध्ये शेंडी ठेवणारांवर ८ रुपये कर लागू केला. ख्रिस्ती लोकांनी हिंदूंची पालखी उचलण्यास बंदी घालण्यात आली. मुंज आणि होमहवन

करण्यास बंदी घालण्यात आली. ख्रिस्ती प्रवचनांना हजार राहण्याची हिंदूंवर सक्ती करण्यात आली. शेकडो स्त्रियांना बाटवण्यात आलं. शांतादुर्गाचं देऊळ तिच्या उत्सवासाठी बंद करण्यात आलं. हिंदू लोकांना राग यावा म्हणून देवीच्या गाभाऱ्यात गायी कापण्यात आल्या. यात काही काही आचरट नियमही करण्यात आलेले होते. त्यात लग्नविधिबद्दलचे नियम सुलतानी होते. चर्चने निषिद्ध ठरवलेल्या दिवशी लग्न करणारास १००० अशर्फी दंड, त्यातील एक तृतीयांश रक्कम चहाडी करणारास आणि बाकी सरकार जमा, दंड न भरला तर 3 वर्षे तुरुंगवास, मग त्यात सुधारणा झाली आणि ब्राह्मण, भटजी यांना आणि होमहवन यावर बंदी घालण्यात आली.. त्यावेळी त्या घरावर पोलिसांना पाळत ठेवण्याचं काम दिलं गेलं. याचा परिणाम एकच झाला की त्यामुळे लोक परगावी जाऊन लग्न करून यायला लागले. त्याचा परिणाम व्यापाऱ्यांवरही झाला, म्हणून तो नियम मागे घेण्यात आला. मग परत नियम बदलले आणि फिरंग्याच्या समोर लग्ने होऊ नयेत म्हणून होडीत, बोटीत, खाडीत, नदीत लग्न करण्याचा हुकूम सुटला. या सर्व वेळोवेळी होत गेलेल्या छळामुळे हिंदूंचा राग अनावर होऊन त्यांना हाकलून लावण्याचा निश्चय नक्की होत गेला.

## शिवाजी महाराज.

आधीच देशातील मुसलमानी अंमलामुळे हिंदूंचा नाईलाज होता. पण जेव्हा शिवाजी महाराजांचा उदय आणि स्वराज्याची स्थापना झाली तेव्हा या हिंदूंना कुणीतरी राजा मिळाला. शिवाजी महाराजांनी स्वराज्याच्या विस्ताराच्या

वेळी सबंध कोकण प्रांतच हाती घेतला. तिथे प्रतापगड, सिंधुदुर्ग असे नामी उत्तम मजबूत दुर्ग बांधले. त्यांचा फिरंग्यांशी सतत संघर्ष झाला. एकमेकांच्या मुलाखात दोन्हीकडील लोक लुटालूट करत असत. त्यातच फिरंग्यानी फतवा काढला की समुद्रात फिरणाऱ्या सर्व गलबतांनी त्यांचं दस्तक घेतलंच पाहिजे. ही मगरुरी शिवाजीमहाराजांना सहन होणं शक्यच नव्हतं. त्यावरची उत्कृष्ट रणनीती म्हणजे महाराजांनी मस्कतच्या इमामाशी मैत्री केली. या इमामची अनेक गलबतं समुद्रात फिरत असल्यामुळे फिरंग्यांशी त्याच्या नेहमी झटापटी होत असत. महाराजांनी त्या इमामशी मैत्री केल्याचा गवगवा केल्यावर पोर्तुगीझ सुतासारखे सरळ झाले. **शिवाजी** या नावाची या पोर्तुगीजांवर प्रचंड दहशत होती. महाराजांचे सेनापती मोरोपंतांनी कोळी राज्ये जिंकून मराठ्यांच्या तलवारींच्या पात्यांची धार फिरंग्यांना दाखवली. त्यामुळे शिवाजी महाराजांशी अनेक वेळा तह करण्याची वेळ फिरंग्यांवर आली. पुढे संभाजी महाराजांचाही या फिरंग्यांशी संघर्ष झाला.. राजाराम महाराजांच्या काळात दोन्ही पक्षांमध्ये जरा शांतता होती, पण या फिरंग्यांना आणि इंग्रजांना नवीन शत्रू निर्माण झाला तो म्हणजे कान्होजी आंगरे.. याच्या शौर्याला तोड नव्हती. याच्याशी संघर्ष करतांना पोर्तुगीझ आणि इंग्रजांना मनाविरुद्ध एक व्हावं लागलं.

## बाजी – चिमाजी बंधूंचा उदय.

सन १७०७ मध्ये औरंगजेबाच्या मृत्यूनंतर, त्याच्या कैदेत असलेल्या शाहूराजांची सुटका औरंगजेबाच्या शहाज्यादांनी केल्यावर शाहूराजे स्वराज्यात

आले आणि ताराराणींवर विजय मिळवून १७०८ च्या जानेवारीत छत्रपती म्हणून तख्तावर बसले. बाळाजी विश्वनाथ पेशवे यांनी दिल्लीला जाऊन सनदा आणल्यावर शाहू महाराजांनी बाजीरावांचे मेहुणे, काशीबाई यांचे बंधू, रामचंद्र महादेव जोशी यांना कल्याण प्रांतावर पाठवलं.. अशारीतीने कल्याण आणि भिवंडी प्रांत मराठ्यांच्या कारभारात सन १७१९ मध्ये दाखल झाला. रामचंद्र महादेव जोशींनाच त्या प्रांताच्या संरक्षणासाठी ठेवण्यात आलं. तेव्हापासून मराठे आणि पोर्तुगीझांच्या झटपटीला सुरुवात झाली पण त्याला उग्र स्वरूप नव्हतं.. अधून मधून तह होत आणि दोन्ही बाजूंनी मोडलेही जात..

बाळाजी विश्वनाथांच्यानंतर बाजीराव पेशव्यांनी निजामाशी झगडा चालू असेपर्यंत पोर्तुगीझांना दुखवलं नाही..पण फिरंग्यांच्या छळाच्या बातम्या येऊ लागल्यावर त्यांना हाकलून लावण्याचा त्यांचा निश्चय नक्की होता. पण त्यावेळी पेशवे बाजीराव आणि चिमाजी बंधू स्वराज्याच्या सीमा यमुनेपर्यंत विस्तारण्यात दंग होते. त्यांचं सगळं लक्ष उत्तरेतील राजकारणावर होतं.

पोर्तुगीझांच्या छळाच्या बातम्या आल्यावर शाहूमहाराजांनी पिलाजी जाधव आणि कल्याणचा सुभेदार कृष्णाजी महादेव यांना पोर्तुगीझांवर पाठवलं.. त्यावेळी साष्टीच्या लोकांच्या मदतीने मराठ्यांना साष्टी मिळवण्यात यश मिळणारच होतं पण मुंबईच्या इंग्रजांनी ७०० सैनिकांची मदत पाठवल्यामुळे ते शक्य झालं नाही. तेव्हा तह करून पिलाजी जाधव परत आले.

## वसईचे शिल्पकार अणजूरकर-फडके-कावळे.

कल्याणजवळच्या अणजूर गावाचे पाठारे क्षत्रिय निंबाजी नाईक यांचे पुत्र गंगाजी नाईक हे या वसईमुक्ती लढ्याचे प्रमुख शिल्पकार. या निंबाजींना ६ पुत्र होते, त्यातील गंगाजींनाच वसई मुक्तीचा ध्यास होता. त्यांनीच मुत्सद्दीपणे रामचंद्र महादेव यांची भेट घेऊन त्यांच्या मनात वसई मुक्तीचा ध्यास भरवला. त्यांनीच मराठी फौजेला गुप्त वाटा, सर्व ठिकाणच्या माऱ्याच्या जागा दाखवून मराठ्यांना यशाच्या पायरीपर्यंत नेलं. अंताजी रघुनाथ कावळे हे मालाडचे देसाई. कळव्याचे, वसईचे अनेक लोक सन १७२२ पासून पुण्याला जाऊन फिरंग्यांचा त्रास पेशव्यांच्या कानावर घालायला लागले. तेव्हा पेशवे सतत मोहिमेवर असल्यामुळे चिमाजीआपांनी यात लक्ष घालायला सुरुवात केली. १३ वर्षे, म्हणजे १७३५ पर्यन्त अंताजी रघुनाथ उतावीळपणाने मराठी फौजेची वाट पाहत होते. त्यांचा त्यातून संयम सुटला आणि त्यांनी उमाबाई दाभाडे यांच्याशी वसई मुक्तिचं काम सोपवण्यासाठी वाटाघाटी केल्या पण यश आलं नाही. पण चिमाजीआपांनी ते मोडून काढलं.

सन १७२० मध्ये, पेशवेपद मिळल्यापासून १७३७ सालामध्ये निजामाला भोपाळच्या तळयावर कोंडून त्याच्याशी शरणागतीचा तह केल्यावर तो संघर्ष संपला. तेव्हा वसई पोर्तुगीझांच्या हातून मोकळी करण्याचे बेत आखण्यात येऊ लागले. बाजी-चिमाजी या दोन्ही बंधूंना फिरंग्यांच्या विरुद्ध मोहीम करणं हे किती आव्हानाचं काम आहे याचा पूर्ण अंदाज होता. कारण सिद्दी, फिरंगी, आणि इंग्रज एकत्र येण्याचा त्यात धोका होता, म्हणून पूर्ण तयारीनिशीच त्यांना ही स्वारी करायची होती.

## सन १७३७ – वसईची मोहीम.

वसई स्वारीचे बेत ठरल्यावर बापुजी श्रीपत, वासुदेव जोशी मुरुडकर, अणजूरकर नाईक, शंकराजी फडके यांच्या सल्ल्याने चिमाजीआपांनी युद्धाची तयारी सुरू केली. बापुजी श्रीपत, सावकार मोरशेट कारंजे, रामचंद्र हरी पटवर्धन, चिमणाजी भिवराव, कर्णाजी हे सारे, कल्याणच्या भवानी आईच्या गोंधळाच्या निमित्ताने सारे एकत्र आले. नामाजी देशमुख, हिराजी, मुराजी ठाकूर, मालजी जीत, लक्ष्मण राऊत कळवेकर, बापू गोरेगावकर, रघुजी वसईकर, लखम चौधरी, खंडोजी लोंढे, जसवंत दहिसकर असे धाडसी तरुण गुप्तपणे या मोहिमेत सामील झाले आणि गोंधळाच्या भेटीच्या वेळी एकत्र जमले. त्यावेळी, शंकराजी फडके आणि गंगाजी नाईक यांनी वसईवर हल्ला चढवायचा आणि चिमाजीआपांनी आपली फौज घेऊ ठाण्यावर चालून जायचं ही रणनीती आखली. ठाण्यातील अनेक बाल-आबाल या मराठ्यांना सामील झाले. कर्णाजी शिंदे, मोराजी बनकर, उमाजी बलकवडे, यांच्या सहाय्याने मोहिमेची आखणी केली. हेच ते वीर ज्यांनी वसई स्वारीचा गोवर्धन उचलला आणि इतिहास घडवला. सर्वांना मोठी उमेद आली. पण वसईवर स्वारी करण्यासाठी तिथल्या भौगोलिक परिस्थितीचा अभ्यास करणं मराठ्यांना आवश्यक होतं.

अलिबागला कोकण किनारा सोडून मुंबईपर्यंत पोचल्यावर तिच्याजवळचा सारा भौगोलिक परिसर लहान लहान बेटं, पाणथळ आणि खाड्या यांनी भरलेला होता. शीव ही मुंबईची उत्तर सीमा होती. मुंबईच्या पूर्वेला घारापुरी, तिच्या उत्तरेला तुरुंबे म्हणजे तुर्भे, पुढे बेलापूरला एक किल्ला होता. या सगळया ठिकाणी खाड्या होत्या. त्यापुढे, सहासष्ट गावांचे साष्टी म्हणजे

आताचे ठाणे आहे. तिच्या भोवती असलेली खाडी, ओहोटीच्या वेळी कळव्याच्या बाजूने ओलांडून ठाणे शहरात शिरता येत असे. वांदऱ्यावरून निघालेली खाडी आणि वसईच्या खाडीचा फाटा यामध्ये ठाणे बेट वसलं आहे. ठाण्याजवळून पुढे जाते ती कल्याणची खाडी. या सर्व भागांच्या जवळपास, कळवे, बदलापूर, पश्चिमेला मरोळ, वेसावे, गोरेगाव, मालाड, बोरीवली, धारावी, आणि त्याच्या उत्तरेला वसई अशी भौगोलिक ठाणी होती. प्रत्येक ठिकाणी एकेक किल्ला होता. आज ही सर्व ठिकाणं भर घातल्यामुळे मुंबईची उपनगरं बनली आहेत.  मराठ्यांची आणि पोर्तुगीझांची लढाई याच बेटांच्या आश्रयाने झाली. बाजीराव उत्तरेत नादीरशहाच्या मोहिमेत गुंतलेले असतांना, चिमाजीआपांनी उत्कृष्ट रणनीती आखून अत्यंत चिवटपणे, या साऱ्या समुद्री बेटातून आपली फौज नेऊन जो विजय मिळवला आणि मराठी फौजेनेही जे अतुल पराक्रम  गाजवले त्याचा इतिहास म्हणजे वसईचा लढा. त्यासाठी चिमाजीआपांनी आखलेली रणनीती म्हणजे वसईच्या स्वारीच्याच वेळी चिमाजीआपांनी इचलकरंजीचे आपले मेहुणे व्यंकटेशराव घोरपडे, आणि कोल्हापूर दरबारचे सरदार नरगुंदचे दादासाहेब भावे यांना गोव्यावर स्वारी करण्यास पाठवलं, त्यामुळे पोर्तुगीझांची फौज वाटली गेली आणि त्यांची वसईवरील शक्ति कमी झाली.

मराठे कधीतरी नक्की चालून येणार याची खात्री असल्यामुळे ठाण्याचा गव्हर्नर लुई बातेलो याने, इंजिनियर आंद्रे रिबेरो कुटीन्हो याला ठाण्याचा मोठा किल्ला बांधण्याला नेमलं. सन १७३४ मध्ये ठाणे – साष्टीच्या किल्ल्याची मजबूत बांधणी करायला सुरुवात केली. त्यासाठी हिंदू मजुरांवर सक्ती केली

गेली आणि बांधकामाच्या खर्चासाठी कर बसवला गेला. तेव्हा बाजीराव चिमाजीआपांनी हा किल्ला पूर्ण होण्याधीच वसईवर हल्ला करण्याचं निश्चित केलं. त्यावेळी ठाण्यातील तमाम हिंदूंना बाटवण्याचा फिरंग्यांचा डाव होता अशी वार्ता बाहेर पसरली आणि लोक घाबरून गेले.

## साष्टी जिंकली.

गुढीपाडवाच्या दुसरे दिवशी, सर्व तयारीनिशी चिमाजीआपा २४ मार्च १७३७ मध्ये पुण्याहून फौज घेऊन निघाले. स्वराज्यातील तमाम श्रेष्ठ सरदार त्यांनी बरोबर घेतले. त्यांनी आपल्या फौजेचे दोन भाग केले. एक फौज वसई जिंकायला शंकराजी फडके यांच्या हाताखाली दिली आणि दुसरी खंडोजी माणकर, होनाजी बलकवडे यांच्यावर साष्टीची जबाबदारी सोपवली. रामचंद्र हरी पटवर्धन, माणकर, वगैरे सरदार बाबामलंगाच्या वाडीवर दबा धरून बसले, आणि दुसरी फौज वसईची फौज माहुलीच्या रानात लपली. २६ मार्चला ठाण्यातील तरुणांनी कळव्याच्या बाजूच्या बुरुजावरील लोकांना ( फुलसरा ) दारू पाजून बेहोश करून ठेवलं होतं कारण तिथूनच ओलांडून ठाण्यात आणि किल्ल्यात शिरायचा रस्ता होता. साहया कोळी, लक्ष्मण राऊत, हंसा कोळी असे धाडसी लोक सरकारविरुद्ध गुप्तपणे त्यांना सामील झाले.

२६ मार्चच्या त्या रात्री मराठी फौजेतील १०० सैनिक शिड्या लावून कळव्याच्या बाजूच्या जेरोनिमो बुरूजावरून किल्ल्यात शिरले आणि इशाऱ्याचे तोफांचे २ आवाज त्यांनी काढले. ते बाबामलंग वाडीवर लपलेल्या

रामचंद्र हरी पटवर्धन, खंडोजी वगैरे फौजेने ऐकले आणि सर्व सरदार त्वरेने साष्टीत शिरले. बदलापूरास बसलेल्या चिमाजीआपांनीही तो यशस्वी आवाज ऐकला. लगेच चिमाजीआपाही फौज घेऊन ठाण्याचा रस्ता दाखवणाऱ्या गणनाक परवारी नावाच्या इसमाला घेऊन बदलापूरहून निघाले आणि उजाडतांना कळव्याला पोचले. घोड्यावरून पायउतार होऊन स्वत: ओहोटीच्या खाडीमधल्या चिखलात पेंढया भरायला लागले आणि त्यावरून त्यांची सर्व फौज ठाण्यात, साष्टीत शिरली. सकाळी उजाडल्यावर पोर्तुगीझांना गावात बघावं तिथे सगळीकडे मराठेच दिसायला लागले. २७ -२८ तारखेस ठाण्यात प्रवेश मिळाल्यावर त्यातील काही मराठे माजिवड्यावर आणि काही घोणसळ्यावर गेले. या ठाण्याच्या लुटीत मराठ्यांना ६३ तोफा मिळाल्या.

साष्टीतील सगळे बुरूज आणि वाटा मराठ्यांनी ताब्यात घेतलेल्या पाहून किल्लेदार बातेलो आणि त्याचे सहकारी आपापली कुटुंबं आणि वित्त घेऊन ठाणे सोडून निघून गेले. “ आमचा तुमचा तह आहे, आमची ही फौज तुमच्यासाठी नाही “ या मराठ्यांच्या थापांमुळे गव्हर्नर बातेलो निर्धास्त राहिला. शेवटी हरला आणि कारंजे बंदरावर म्हणजे आताच्या उरणला निघून गेला..

साष्टी हाती येणं म्हणजे वसई मोहिमेतील अर्धा विजय होता. दुसरे दिवशी झालेल्या लुटलूटीत ठाण्याच्या किल्ल्यातून मराठ्यांना अनेक लहान मोठ्या तोफा मिळाल्या. कळव्याच्या बाजूच्या ज्या जेरोनिमा बुरूजातून मराठे आत शिरले त्याचं नाव **फत्ते बुरूज** असं ठेवलं.. चिमाजीआपांनी खूष होऊन सर्व फौजेला बक्षिसं वाटली.  लगेच मराठी फौजेने आजूबाजूची सर्व ठाणी, मरोळ, मालाड, तुर्भे-तुरुंबे, जिंकली. फक्त वेसावे आणि वांद्रे ही ठाणी जिंकता

आली नाहीत.. पारसिक आणि बेलापुर ठाणी नारायण जोशी यांनी ताब्यात घेतली. अशारीतीने मराठ्यांना ठाणे जिंकण्यात अपूर्व यश मिळालं. आता फक्त वसई ताब्यात यायची राहिली होती.

त्याकाळी हल्लीचा मुंबई-पुणे रस्ता मराठ्यांना वाहतुकीसाठी अस्तित्त्वात नव्हता. मुंबईच्या इंग्रजांनी आपल्या किल्ल्यासमोर आत आलेला समुद्र ओलांडून पनवेलमध्ये जेटी बांधली आणि पनवेल, चौक-खोपोली-राजमाची असा मार्ग तयार केला होता. त्या मार्गाने जातांना त्यांना ड्यूक्स नोज हे आजचं शिखर, त्यांच्या निद्रिस्त राजाची आठवण करून देणारं दिसलं. आजही निद्रिस्त चेहरा, नाक आणि त्याखालील दाढी यामुळे त्याच नावाने प्रसिद्ध आहे..पुण्याहून कल्याणला जाणाऱ्या प्रवाशांसाठी भीमाशंकरवरून, माळशेज, लोणावळयाहून कल्याणला उतरण्याचा मार्ग होता. आजचा आगगाडीचा कल्याण-बदलापूर-कर्जत-राजमाचीवरुन पुणे असा त्याकाळीही वहिवाटीसाठी होता.

## वसईचा विजय.

वसई हे एक बेटच आहे. हिच्या दक्षिणेला खाडी, पश्चिमेला समुद्र, आणि उत्तरेला वैतरणा नदी आहे. पोर्तुगीझांनी खाडीवर सर्व ठिकाणी चौक्या ठेवल्या होत्या. वसई गावात शिरण्यासाठी, छोटं गाव, राजावळीच्या ताऱ्यावरून म्हणजे उंचवट्यावरून, गोखरवे इथून आत शिरायला छोट्या खाडीवर एक छोटासा पूल होता.

२६ मार्चला शंकराजी फडके यांच्या हाताखालची फौज माहुलीच्या रानात दबा धरून बसली आणि मग लपत छपत, घोटवडे, तुंगार कामनाच्या रानात, असं एकेका रानाचा आश्रय करत वसईच्या दिशेने सरकायला लागली. वसईत शिरण्यासाठी आले तेव्हा राजावळीच्या उतारावर २०० सैनिक, गोखरवे पुलावर ३० सैनिक दिसले. इतर चौक्यांमद्धे पोर्तुगीझ सैन्याची हालचाल त्यांना दिसली. पोर्तुगीझांना मराठी आक्रमणाची कुणकुण लागली होती. आता गुप्तपणे किल्ल्यात शिरणे अशक्य होते म्हणून शंकराजी फडके यांनी फौजेला पोहून जायला हुकूम दिला आणि त्यासाठी त्यांनी एकेक शेर वजनाची सोन्याची कडी बक्षीस दिली. त्याप्रमाणे २५० शिपाई पोहून गेले. मग रामजी तुंगकरच्या होडीतून दरवेळी १०/ १५ फौज असं करत २५० फौज पलीकडे नेली. ही फौज वसई गावात शिरली त्यामुळे दोन्ही फौजा एकमेकांना भिडल्या आणि दंगल उसळली. बेसावध फिरंगी फौज मराठ्यांनी कापून काढली आणि सर्वजण गावात शिरले. कापाकापी सुरू झाली.

उजाडता उजाडता, चिमणाजी भिवराव, बरवाजी ताकपिर हेही येऊन फौजेला मिळाले. पापडी, माणिकपूर बहादूरगड, सोपारे सर्व ठाणी मराठ्यांच्या हाती आली. मराठे तिथून अर्नाळा किल्ल्यावर गेले. पण तो जंजीरासारखा पाण्याने वेढलेला किल्ला होता. तोही जिंकला. या गर्दीत शंकराजी फडके पापडी-माणिकपुऱ्यावरून वसई किल्ल्याच्या तटाला भिडले. पण या भक्कम जागी हल्ला करण्याएवढी फौज त्यांच्याकडे नव्हती, म्हणून पेशव्यांची सेना मदतीला येईपर्यंत त्यांनी आजूबाजूची बारीक बारीक ठाणी जिंकायला सुरुवात केली. १ एप्रिलपासुन १६ मेपर्यंत टकमक, अर्नाळा, मांडवी, तांदुळवाडी, मनोर

ही सर्व ठाणी मराठ्यांच्या कब्जात आली. वेसावे, वांद्रे ही ठाणी प्रयत्न करूनही हाती आली नाहीत. पण बेलापुरचा मब्याजो किल्ला, मरोळ, जीवधन, पारसिक, मांडवी, सांताक्रूझ, मनोर, तांदुळवाडी, ही ठाणी मराठ्यांनी मिळवली. या सर्व लढाया होड्या वापरुन झाल्या. त्यातही अर्नाळा किल्ला जिंकणं फार अवघड होतं, कारण जंजिऱ्याप्रमाणेच ते एक स्वतंत्र बेट होतं. वैतरणा नदी जिथे समुद्राला मिळते, तिथे खाडी खूप रुंद असल्यामुळे शत्रूच्या गलबतांवर मारा करायला ते मोक्याचं ठिकाण होतं. वसई तिथून अवघ्या ७ / ८ मैलांवर असल्यामुळे वसईवर दाब राहणार होता आणि ते ठिकाण मुख्य आरमारी ठाणे करता येणार होतं. पण तो लढून जिंकणं अशक्य असल्यामुळे गावातील महत्त्वाचे लोक फोडूनच किल्ला जिंकला. बोळींजचा गवराजी पाटील मराठ्यांना सामील झाला. त्याने दर्यावर्दी आणि गलबतं पुरवली. म्हणून त्यातून मराठे किल्ल्यात शिरले. आणि किल्ला हाती आला. एवढी ठाणी मे महिन्यापर्यंत मिळवली. मग वसईवर जायचं ठरलं. ऐन पावसाळ्यात जवळपासची ठाणी जिंकायला सुरुवात केली.

## वसईवर हल्ला.

वसईवर पहिला हल्ला ३० मे १७३७ ला झाला. पण तो फसला. पाठोपाठ २ दिवसांनी मराठ्यांनी सांताक्रूझ मिळवलं तोपर्यंत पुढचा पावसाळा जवळ आल्यामुळे १ जुलै, १७३७ ला, आपा पुण्याला परतले. अस्थम्याचा त्रास असलेल्या चिमाजीआपांना या मोहिमेत समुद्री हवेचा खूप त्रास झाला.

३० मे नंतर गंगाजी नाईक, शंकराजी फडके, मोराजी, कर्णाजी शिंदे या वीर मराठ्यांनी ४००० फौजेसह परत २८ जूनला बहादूरपुऱ्यावर ऐन पावसात शिड्या लावल्या पण त्याच चिखलात रुतल्या, किल्ल्यावरून आगीचा मारा झाला, त्यामुळे तोही प्रयत्न वाया गेला.. पण मराठ्यांची वसई जिंकायची नशा अजून किंचितही कमी झाली नव्हती. त्यांनी १२ जुलैला धारावीवर हल्ला केला. तिथे फिरंग्यांचा सरदार कारव्हालोला मराठ्यांच्या साहसाची आग सोसावी लागली. फाजील शहाणपणा करून तो फौज, तोफा घेऊन मराठ्यांच्या तळावर शिरला. मराठ्यांनी त्याला आत येऊ दिलं. आणि मग असं चोपून काढलं की विचारता सोय नाही. कारव्हालोची फौज वाऱ्यासारखी धावायला लागली. ते गलबताकडे धावायला लागले, तेव्हा त्यांचा पाठलाग करून अनेकांना ठार केलं. गलबतावरही तोफा चालवल्या. त्यावरचे लोकही ठार केले.

'' वसई मिळवायची तर पावसाळ्यातच शक्य आहे हे ओळखून मराठ्यांनी ९ सप्टेंबरला किल्ल्यावर लगट केली. दोनदा हल्ला करूनही यश मिळालं नव्हतं, आतासुद्धा नशिबाची परीक्षा पाहायची होती. यासाठी पुण्याहून चिमाजीआपांचा सल्ला घेऊन आणखी सामानाची मागणी केली. चिमाजी आपांचाही याला होकार आला. पण यावेळी नक्की यश मिळावं म्हणून त्यांनी आपला, कायम प्रत्येक मोहिमेत यशाची खात्री देणारा, हुकूमाचा एक्का, बाजी भिवराव रेठरेकर याला ताबडतोब वसईला रवाना केलं.

बाजी भिवराव २७ ऑगस्टला चिंचवडास गेले. दुसरे दिवशी २८ तारखेस नाणे मावळात पाटणला पोचले, २९ तारखेस पळसदरीवर आले.. ३१

तारखेला कल्याणला आले, १ सप्टेंबरला मांडवी गाठली आणि २ तारखेला वसईजवळ पापडीला मराठ्यांच्या तळावर पोचले. बाजींना मुद्दाम वसई जिंकण्यासाठीच पाठवलं असल्यामुळे तळावरील लोकांनी हल्ला करण्यासाठी शिड्या वगैरे सामानाची तरतूद करून ठेवली होती. ४ सप्टेंबरला रात्री ८ वाजताच्या अंधारात मराठ्यांनी तटाला शिड्या लावल्या.. ''.

**वसईवर तिसरा हल्ला**.

४ सप्टेंबरला बाजी भिवराव रेठरेकरांच्या मार्गदर्शनाखाली, ४५ शिड्या वसईच्या तटाला लावण्यात आल्या. त्यावरून ३००० शिपायांनी वर जायचं, आणि ते घाबरून खाली आले तर खाली ३००० राऊतांना उभं केलं होतं, त्यांनी परत वर पाठवायचं नाहीतर कापून काढायचं असा हुकूम बाजी भिवरावांनी दिला. किल्ला जिंकायचाच या निश्चयाने मराठे वसई किल्ल्याला भिडले. पण फिरंग्याना ही बातमी आधीच कळल्यामुळे त्यांनी आगीचा अफाट मारा मराठ्यांवर केला. ४००/ ५०० फौज किडया मुंग्यांसारखी, तोफा, बंदुकींच्या आगीत भाजून जमिनीवर आली. अनेक शिपाई जखमी झाले. शिड्याही जळून गेल्या. प्राणावर उदार होऊन वसई जिंकायचा हा प्रयत्न असफल ठरला. पाठोपाठ केळव्याचा वेढाही फुकट गेला तेव्हा पुण्याहून चिमाजीआपांनी पावसाळ्यापुरते परत गेलेल्या रामचंद्र हरी पटवर्धन यांना परत माहीमवर पाठवलं.

माहीमच्या वेढ्यात रामचंद्र हरींनी पराक्रम गाजवला. शत्रूवर तलवार चालवून २५ लोकांचे मुडदे पाडले, इतक्यात त्यांच्या हाताला दंडाजवळ फिरंग्याची गोळी लागली. त्या झटक्यात तलवार पडली आणि गुडघ्यावर पडली. त्याने गुडघ्यालाही जखम झाली. शत्रूच्या जोरदार माऱ्यामुळे माहीमचा वेढाही निष्फळ ठरला. अमरसिंग शिर्के यांनी घोडी चालवून शत्रूचे लोक मारले. माहीम सोडून रामचंद्र हरी शिरगावच्या वेढ्यात गेले. आता पुण्याहून मदत येण्याची वाट पाहण्याशिवाय इलाज नव्हता.

एवढी ठाणी हाताची गेल्यामुळे फौजेच्या कमतरतेमुळे एवढे केलेले श्रम वाया जातात की काय या चिंतेत असताना भोपाळवरील निजामावरील यशस्वी मोहीम आटपून बाजीराव परत आल्यामुळे आता त्यांच्या मोठ्या फौजेचा आधार होता. सन १७३८ सालच्या पुण्याच्या मुक्कामात बाजीराव आणि चिमाजी बंधूंनी, वरचेवर शिबंदी पोचवून नाश होण्यापेक्षा एकाच घावात फिरंगी खणून काढावा असा निश्चय केला.

१७३८ सालच्या सप्टेंबरमध्ये पोर्तुगालहून फिरंग्याना मदत पोचली तेव्हा पेद्रु डिमेलो साष्टी जिंकायला परत आला. पण किल्ल्याच्या भोवती पाहणी करत असतांना  किल्ल्यातून आलेल्या मराठ्यांच्या तोफेचा गोळा त्याला लागला आणि पडावातील तो एकटाच ठार झाला. त्याची फौज पळून गेली० किल्ला मराठ्यांकडेच राहिला. तो पावसाळा संपल्यावर चिमाजी आपांनी फौज पाठवली त्याच  काळात दमणावर स्वारी करायचे बेत आखले गेले. शंकराजी फडके नोव्हेंबरात दमणला गेले. त्यांनी सहज दमण जिंकलं.

वसईत चाललेल्या झुंजीच्या काळात पुण्याला विश्रांतीला गेलेले चिमाजीआपा पुण्यात नव्हतेच. पेशवे बाजीराव निजामावर चालून गेले, भोपाळावर त्यांनी निजामाला कोंडला, पण निजामचा मुलगा नासीरजंग दक्षिणेतून फौज घेऊन बापाच्या मदतीला येईल म्हणून बाजीरावांनी त्याला अडवण्याची जबाबदारी चिमाजीआपांवर टाकली. त्याप्रमाणे आपा नोव्हेंबरात खानदेशात वरणगावी होते. निजामाचा गुंता संपल्यावर चिमाजी फिरंगणात आले. त्यामुळे सर्वांना हुरूप आला.

वसई मोहिमेचा सोक्षमोक्ष लावायचाच या इर्षेने झपाटलेले, शिंदे-होळकर-बाजी भिवराव रेठरेकर, पिलाजी जाधव, तुकोजी आणि जिवाजी पवार, मिरजेचे सरदार रामचंद्र हरी पटवर्धन असे सर्व मोठे सरदार घेऊन चिमाजीआपा सन १७३८ सालच्या डिसेंबरमध्ये घाटाखाली सायगाव नावाचं गाव आहे तिथे उतरले आणि ३० डिसेंबरला माहीमच्या कसब्यात त्यांनी मुक्काम ठोकला. १४,००० घोडे, १५ हत्ती, २००० उंट, ८००० घोडदळ आणि १२ तोफा, २०००० पेंढारी घेऊन ते आले.

## ..... आणि वसईचा अखेरचा संग्राम सुरू झाला. तारापूर-

हाताची गेलेली ठाणी माहीम, केळवे, शिरगाव जिंकून मराठे तारापूरच्या बळकट किल्ल्यावर आले. त्याच्या बाहेर ८ हात रुंद आणि तेवढाच ८ हात खोल असा मोठा खंदक होता आणि तटबंदीही भक्कम होती. वेढा बसल्यापासून ७ वे दिवशी २३ जानेवारीला सुरुंगाला बत्ती द्यायचं ठरलं.

मराठ्यांच्या तोफा सतत ३ दिवस अहोरात्र चालू राहिल्या. पण उपयोग झाला नाही म्हणून बुरूजच उडवायचे असं ठरलं. त्यासाठी ५ ठिकाणी सुरुंग पेरले. शिवाय तटबंदीवर शिड्याही लावल्या होत्या. सुरूग फुटले की शिपाई शिड्यांनी तटापलीकडे जायचं नक्की झालं.

२४ जानेवारीला चिमाजीआपा आणि पायाला झालेल्या जखमेमुळे, मल्हारराव होळकर खाडीमधल्या माडीमद्धे जाऊन बसले. ठरल्याप्रमाणे उजाडल्यावर बत्ती दिली. एकापाठोपाठ एक सुरुंग फुटायला लागले. तटबंदीवर लहान मोठी अनेक भगदाडे पडली. त्याबरोबर सैनिकांनी किल्ल्याला लगट केली. मोठा संग्राम घडला. मर्दुमकीचा कहर झालं..किल्ल्यातून होणाऱ्या फिरंग्याच्या आगीने अनेकजण भाजले, काही मेले, काही ठार झाले. दोन्ही बाजूंनी पराक्रमाची शर्थ झाली. पण लढाईचा निकाल तारापूर जिंकण्यात झाला. **मात्र बाजी भिवराव रेठरेकर तोंडात गोळा लागून ठार झाले ही फार मोठी हानी झाली. ते पेशवे बंधूंचे बालमित्र, अत्यंत विश्वासू आणि पराक्रमी सरदार होते. आपा आणि बाजीरावांनी बाजी भिवराव यांच्या मातोश्रीना पत्र लिहून हकीकत कळवली, त्यात लिहिलं की आमचा तर भाऊच गेला.. मीच तुमचा बाजीराव असं समजा “** या सर्व ठाण्यांमद्धे मराठ्यांच्या मर्दुमकीचा कहर झाला. किल्ल्यासाठी लावलेले सुरुंग फुटले तेव्हा दोन्हीकडील लोक मोठ्या संख्येने ठार झाले. त्यातही तारापूरचा संग्राम जास्त गाजला. ही सर्व ठाणी हातात आली. या पाठोपाठ मराठे अशेरी, मढ, वेसावे, ही ठाणी जिंकण्यात यशस्वी झाले.

## वसईची पराक्रमी झुंज. वसई जिंकली. ५ मे १७३९.

आता मुख्य वसईचा किल्ला ताब्यात घेणे हे महत्त्वाचं कार्य राहिलं. वसईत बाजार बुणग्यांसह २ लाख फौज जमली. या सर्व ठिकाणी लढाया चालू असतांना चिमाजीआपांनी वसईवर हल्ला करायचं काम हाती घेतलं. फेब्रुवारीच्या ६ तारखेला चिमाजीआपा वसईत येऊन बसले. लगेच मोर्चे बांधणी सुरुवात झाली. तीन बाजूंनी पाणी असल्यामुळे फक्त उत्तर दिशा मोकळी होती. स्वराज्यातील सगळे मोठे मोठे सरदार या मोहिमेत सामील झाले होते. वसईची झुंज ३ महिने अतिशय चिकाटीने झाली. मोर्चे बांधून झाल्यावर दोन्हीकडून तोफांचा मारा सुरू झाला. आगीने मराठी फौज भाजायला लागली पण हार मानत नव्हती. तेव्हा सगळी वसईवर फौज आली होती. तिकडे नादीरशहाच्या स्वारीमुळे स्वराज्यावर आणखी एक संकट आलं. सारे मोठे सरदार आणि त्यांची सारी फौज वसईत असल्यामुळे, नादीरशहाच्या स्वारीत बाजीरावांकडे फौज कमी पडायला लागली. त्यांच्या मदतीला जाणं भाग होतं तेव्हा मिरजेचे सरदार गोविंद हरी पटवर्धन यांना चिमाजीआपांनी बाजीरावांच्या मदतीस उत्तरेत पाठवलं. रामचंद्र हरी आपांबरोबर राहिले.

मार्च महिन्यात वसई तटांच्या खाली सुरुंगासाठी भुयार खणणे सुरू झालं. पण रेताळ जमीन आणि पाणी लागणं यामुळे खूप त्रास झाला. मराठे सुरुंग पेरत होते आणि फिरंगी ते पाणी घालून विझवत होते. असं २ महिने चाललं. शेवटी किल्ल्यापर्यंत पोचतील अशी भुयारं तयार झाली आणि ३० एप्रिलला तटबंदी ढासळेल असे सुरुंग तयार झाले.. राणोजी शिंदे यांचे ५, यशवंतराव पवार आणि राणोजी भोसले यांचे २, मल्हारराव होळकरांचा सरदार

संताजी वाघ याचा एक मोठा असे सुरुंग वसई किल्ल्याच्या तटाला जाऊन भिडले. सगळे मिळून १४ सुरुंग तयार झाले.

दुसरे दिवशी, १ मे रोजी, सुरुंगांना बत्ती दिली गेली. बुरूज ढासळले की शिड्या लावून शिपायांनी आत शिरायची सिद्धता झाली. बत्ती दिल्याबरोबर काही सुरुंग फुटले, तेवढ्यात शिपायांनी किल्ल्यात शिरायची गर्दी केली. त्याचवेळी आणखी दोन सुरुंग फुटले. त्या धमक्याने माणूस दगडासारखा आकाशात उडाला आणि खाली आला. जबर हंगामा झाला. तरीसुद्धा अजून दोन सुरुंग फुटले नव्हते. पण जे भगदाड तटाला पडलं, त्यातून मराठे वीर, धरण फुटून पाण्याचा लोट यावा तसे किल्ल्यात शिरले. फिरंगीही हल्ला परतवायला तयारच होता. त्यांनी आगीचा मारा मराठ्यांवर केला. घमासान युद्ध झालं. आंद्रियानो गाव्हिल्ला आणि मस्कारेन्हास यांनी आपली कामगिरी चोख बजावली. तेवढ्यात उरलेले सुरुंगांचेही स्फोट झाले आणि त्या बुरूजावरचे मराठे पक्षासारखे हवेत उडून खाली पडले. काही भाजले, काही मेले, काही स्फोटामुळे उडालेल्या दगड धोंड्यांच्या आत अडकले. सगळीकडे हाहा:कार उडाला. भागीरथ प्रयत्न करूनही यश आलं नव्हतं. दोन्हीकडे मोठी मनुष्यहानी झाली.

पण चिमाजीआपांची जिद्द अलोट होती. दुसरे दिवशी परत प्रयत्न करायचं ठरलं.. त्यासाठी अनेकांना बक्षिसं दिली कबूल केली. दुसरे दिवशी आणखी दोन सुरुंग उडायचे राहिले होते, त्यांचा शोध घेतला. त्यात दारू ओतली. त्यांच्या बत्त्या ठीक करून, सैनिकांना घाई न करण्याची ताकीद देऊन ते २ सुरुंग उडवले. तेव्हा निम्मा बुरूज उडाला. त्याबरोबर धाडसी वीर

किल्ल्यावर चालून गेले. जे मेले ते मेले, जे जळले ते जळले हा विचार नक्की झाला. ठरल्याप्रमाणे बत्ती दिल्याबरोबर धमाका झाला आणि बुरूजाला खिंडार पडलं. किल्ल्यात भयंकर रणकंदन माजलं. आसरा दिसला की त्याजागी मराठे आग सोसत ठासून उभे राहिले. आणि तिथून पोर्तुगीझांवर हल्ला करत राहिले. अनेकजण ठार झाले, काहींच्या चिंधड्या झाल्या, दोन्हीकडील फौजेची मोठीच प्राणहानी झाली. मराठ्यांच्या झुंडीच्या झुंडी किल्ल्यात शिरायला लागल्या. त्यात आतले मोठे मोठे फिरंगी अधिकारी ठार झाले. बाहेरून आगीचा वर्षाव, बरीच फौज गारद झाली त्यामुळे त्या रात्री सर्व जागल्या वाचलेल्या फिरंग्यानी एकत्र बसून विचार केला. गोव्याहून मदत येणार नव्हती. दारूगोळाही संपत आला होता. सोनं चांदी मोडून टाकलं होतं. त्यामुळे शरणागतीशिवाय पर्याय राहिला नाही.

४ मे या दिवशी सब्याशियम बुरूजावर मराठ्यांना दुसरे दिवशी सकाळी पांढरं निशाण घेऊन शेवटी किल्ल्यातून कौल मागायला माणूस दिसला. फिरंग्यांचा एक माणूस आपांकडे आला आणि तहाची बोलणी करायची परवानगी द्या म्हणाला, ती घटका, ते पळ, मराठ्यांसाठी अपार आनंदाचे होते.. आज त्यांची भूमी दुष्टांच्या शृंखलातून मुक्त झाली होती. मराठ्यांच्या आत्मसमर्पणाला तोड नव्हती.. पेद्रो बार्रात नावाचा सरदार बोलणी करायला आला म्हणजे जे मराठे म्हणतील त्याला हो म्हणायला आला. या दोन दिवसांच्या हल्ल्यात जे वीर ठार झाले, त्यात दत्ताजी भांडवलकार, करजेकर, सेखो गणेश सरनाईक, हंसू आढाव पुणेकर, मुरारजी नाईक अणजुरकर, अशा अनेकांनी आत्माहुती दिली.

## वसईवर भगवं निशाण०

वसई किल्ल्यावर भगवं निशाण लावायचं भाग्य, मिरजेच्या पटवर्धन सरदार घराण्याची तासगाव शाखा, रामचंद्र हरी पटवर्धन यांना मिळालं. त्याबद्दल त्यांना वसईची फडणीशी बक्षीस म्हणून मिळाली. चिमाजीआपांनी माणकोजी पाथरवटाला बोलावून किल्ल्यामध्धे मारुतीची मूर्ति घडवून स्थापना केली..

उत्तरेला खुष्कीकडे कव्हरेली, रमेडी, आणि सब्याशीयम नावाचे ३ बुरूज होते, त्याच्या जवळपास हे १० सुरुंग पेरले आणि ते उडवले म्हणून हा विजय हाती आला. एकदम १० सुरुंगांना बत्ती द्यायची आणि भगदाडे पडताच शिपायांनी आत शिरायचे असा बेत ठरला. चिमाजीआपांनी शिड्या आणि तटाच्या बाजू सैनिकांना वाटून दिल्या. तटबंदीजवळ चर खणून शिपायांना त्यात लपून राहण्यासाठी जागा करून ठेवली. इशारतीचा नगारा वाजताच सुरुंगांना बत्ती द्यायची आणि धमाका झाला की फौजेने आत हल्ला करायचा अशी रणनीती ठरली. या उत्कृष्ट रणनीतीमुळेच किल्ल्यावर भगवं निशाण लागलं..

त्याप्रमाणे १ मे १७३९ रोजी सुरुंगांना बत्ती दिली गेली. २ तारखेला परत मोठा हल्ला झाला. त्या रात्री फिरंग्यांनी एकत्र येऊन शरण जाण्याचा विचार केला. ४ तारखेला पांढरे निशाण घेऊन सब्याशियम किल्ल्यावर मराठ्यांना माणूस दिसला. तेव्हा लढाई थांबली. तहाचे बोलणे करण्यास येतो, परवाना द्या अशी मागणी फिरंग्यानी केली. तेव्हा रीतसर परवाना पाठवल्यावर पेद्रो बार्रात

नावाचा सरदार ५ मे या दिवशी मराठी लष्करात पोचला. तहाच्या वाटाघाटी झाल्या. ७ दिवसात किल्ला रिकामा करून द्यायचं ठरलं, १२ मे १७३९ या दिवशीपर्यन्त फिरंग्यानी किल्ला रिकामा केला. पेद्रो बार्रात हा वकील तोपर्यंत मराठ्यांकडे ओलिस राहिला. त्यानंतर मराठे किल्ल्यात शिरले.

१३ मे १७३९ या दिवशी सिद्धार्थ संवत्सरी रिकामा किल्ला हाती आला. वसई किल्ल्यावर भगवं निशाण लावायचं भाग्य, मिरजेच्या पटवर्धन सरदार घराण्याची तासगाव शाखा, रामचंद्र हरी पटवर्धन यांना मिळालं. त्याबद्दल त्यांना वसईची फडणीशी बक्षीस म्हणून मिळाली. चिमाजीआपांनी माणकोजी पाथरवटाला बोलावून किल्ल्यामद्धे मारुतीची मूर्ति घडवून २७ जुलैला स्थापना केली..

५ मेला पोर्तुगीझांचा वकील चिमाजीआपांकडे आला. तहाच्या अटी निश्चित झाल्यावर १२ मे या दिवशी फिरंगी किल्ला सोडून निघून गेले. या अटींमध्ये, १. पोर्तुगीज फौज आणि बुणगे यांना सर्व हत्यारांसह बॅंड वाजवित निशाण उभारून सुरक्षितपणे बाहेर जाऊ द्यावे, ( हा ताठ मानेचा स्वभाव लक्षात ठेवण्यासारखा आहे ) २. ज्या फिरंग्यांना वसई सोडायची असेल त्यांना त्यांची मालमत्ता घेऊ जाऊ द्यावं, ३. त्यांना लागणारी गलबते मराठ्यांनी पुरवावीत, ४. जे ख्रिस्ती वसईत राहू इछितात त्यांना त्यांचे धर्म पाळण्यास मुभा असावी, ५. एकमेकांचे पकडलेले कैदी परत करावेत, ६. किल्ला सोडून जातेवेळी मराठी फौज त्रास देईल म्हणून चिमाजीआपांनी आपली फौज बहादूर पुऱ्यालादूर न्यावी, आणि पोर्तुगीझ लोक जहाजात बसून तोफेच्या टप्प्याबाहेर जाईपर्यंत मराठ्यांनी किल्ल्यात प्रवेश करू नये. ७. वसईतील ३ ख्रिस्ती देवळे तशीच

राहू द्यावीत, ( मुंबईत अजून पोर्तुगीझ चर्च शिल्लक आहे ) त्यातील मूर्तींना दागिन्यांना हात लावू नये अशा अटी होत्या. ८. वसईतील कोणताही माल योग्य किंमतीला मराठ्यांनी विकत घ्यावा..त्या सर्व अटीकबूल झाल्या पण ९. वसईतील दारूगोळा व दाणागोटा नेऊ द्यावा हे कलाम चिमाजीआपांनी कबूल केलं नाही. त्याप्रमाणे १२ तारखेला किल्ल्यातील लोक निघून गेल्यावर १३ तारखेस मराठ्यांनी वसई किल्ल्यात प्रवेश केला. **१३ मे १७३९ या दिनी वसई हाती आली**. '' मराठ्यांनी आपली कबुलात तंतोतंत पाळून शत्रूला सन्मानाने वागवले '' असे उद्गार स्वत: पोर्तुगिझांनी काढले, ही आपली उदात्त मानसिकता.

इकडे वसईचा विजय आणि तिकडे मराठ्यांनी व्यंकटेशराव घोरपडे आणि नरगुंदकर दादासाहेब भावे यांच्या हाताखाली फोंडा, मडगाव, मार्मगोवा अशी ठाणी जिंकून, गोवे जिंकलं. २७ एप्रिलला गोव्याशी तह झाला. तिकडे माणकोजी आंग्रे यांनी २००० लोक ४० गलबतं भरून करंज्यावर नेली आणि ५ दिवस लढून कारंजे – उरण बंदर मिळवलं. अशारीतीने मराठ्यांच्या यशाची कमान आणखी वर गेली.

## गोव्याचा तह-

वसई जिंकायची तर तिचा दुसरा पंख गोवा त्यावरही गळफास आणायला हवा ही बाजी -चिमाजींची मसलत, सन १७३८ च्या पावसाळयात नक्की झाली. त्यांनी गोव्याच्या स्वारीसाठी पेशव्यांनी आपले मेहुणे, आपल्या

बहिणीचे पती, इचलकरंजीचे सरदार व्यंकटराव घोरपडे यांची नियुक्ती केली. त्याच्या हाताखाली गोव्याचा शूर, मुत्सद्दी सरदार गोविंदराम ठाकूर याची नेमणूक केली. हा गोवा प्रांताचा उत्तम माहितगार होता. त्याशिवाय सावंतवाडीकरांनाही त्यांच्या मदतीला दिलं.. सावंतांना त्याचा खूप आनंद झाला कारण गोव्याच्या सरहद्दीला लागून त्यांचा सुभा असल्यामुळे दोघांमध्ये सतत झटापटी होत असत. आता पेशवेच गोवेकरांना धडा शिकवणार होते.

१२ जानेवारीला १७३९ ला, दिघीच्या घाटाने व्यंकटेशराव ७००० फौज घेऊन गोव्यात उतरले. लगेच १५ जानेवारीला त्यांनी मडगाव ठाणे हस्तगत केलं. पाठोपाठ रायतूर, मार्मागोवा, फेब्रुवारीच्या १९ तारखेला फोंड्याचा मर्दनगड किल्ला, आणि सावंतकरांनी बारदेश जिंकला. सबंध गोवा प्रांत मराठ्यांच्या हाती जाणार हे पाहताच, गोवेकरांनी तहाची बोलणी सुरू केली. मात्र गोव्यातून फिरंग्यांना हुसकून लावण्याचाच व्यंकटेशरावांचा निर्धार होता. म्हणून त्यांनी तहाची याचना सरळ धुडकावून लावली.

पण तेवढ्यात बाजीरावांचे पत्र आलं की नादिरशहावर चालून जाण्याची जरूर असल्यामुळे तह करून ताबडतोब परत यावं. त्यामुळे गोव्याची स्वारी व्यंकटेशरावांनी अवराती घेतली. पोर्तुगीझांशी तह केला आणि ते परत आले.

वसई आणि गोवा जिंकल्यावर मराठ्यांचा प्रचंड फायदा झाला. लांबलचक सागरी किनारा हाती आला. या ७५ मैलाच्या टापूमद्धे ३४० गावं, ८ शहरं, २० किल्ले, २५ लाखांचा दारूगोळा, जहाजं, लहान मोठ्या अनेक तोफा हाती आल्या. पोर्तुगीझांच्या चर्चमधली सुमधुर आवाजाची प्रचंड मोठी

घंटा एक मोठं आकर्षण ठरलं. वसई विजयाचं प्रतीक म्हणून त्या घंटा स्वराज्यातील देवळांमद्धे स्थापन झाल्या. फक्त दमण फिरंग्यांच्या हाती राहिलं..सन १५३३ पासून चालू असलेली २०० वर्षांची पोर्तुगीझ सत्ता चिमाजीआपांनी उलथवली आणि स्वराज्यात वसई आली, हिंदूवरचा छळ थांबला. प्रजा मुक्त झाली. हिंदू धर्माची परत स्थापना झाली. हे विशेष झालं. वसईमद्धे आजवर देवतांची मंदिरं उभी राहिली नव्हती. ते आता काम मोठ्या श्रद्धेने झालं. चिमाजी आपांनी वज्रेश्वरीच्या वज्रयोगिनीला नवस केला होता. पण त्यांच्या देहावसानानंतर तो नानासाहेब पेशव्यांनी पूर्ण केला..

या युद्धामुळे इंग्रज नरम झाले आणि चिमाजीआपांना अदबीने भेटायला आले. मराठ्यांचा दरारा शतपटीने वाढला. वसईच्या कारभाराची व्यवस्था झाली. शंकराजी फडके, कावळे, अणजूरकरांचा, फिरंग्याच्या हातातील वसई मुक्तीचा ध्यास पूर्ण झाला.. वसईचा कारभार नेटास लावून चिमाजीआपा ३ सप्टेंबरला पुण्यात आले..त्यांच्या मातोश्री राधाबाईही त्यांच्या समवेत वसईत होत्या. खुद्द बाजीराव त्यांना सामोरे गेले.

बाजीराव आणि चिमाजीआपा यांच्या पराक्रमाला आणि यशाला सीमा नव्हत्या. दोघे बंधू सूर्य-चंद्रासारखे स्वराज्यावर २० वर्षे तळपत राहिले. आणि पुढल्या वर्षी सन १७४० मध्ये ६ महिन्यांच्या अंतराने स्वराज्यावरूनच नव्हे तर भारत भूमीवरून अस्तंगत झाले..स्वराज्यात सगळा अंध:कार पसरला. २८ एप्रिल, १७४० या दिवशी विषमज्वराच्या दुखण्याने राऊ रावेरला शांत झाले आणि पाठोपाठ ६ महिन्यांनी लक्ष्मणासारखे बाजीरावांच्या पाठीशी उभे राहणारे, प्रत्येक लढाईत साथ देणारे, तेवढेच पराक्रमी, चिमाजीआपा, १७

डिसेंबरला पुण्यात कैलासवासी झाले. आपली एक महिन्याची मुलगी सोडून चिमाजीआपांच्या पत्नी सती गेल्या.

चिमाजीआपांना शरीरस्वास्थ्य जास्त लाभलं नाही. शरीराने अशक्त आणि दम्याचा बालपणापासून त्यांना त्रास होता, तरीही ते सर्व लष्करी मोहिमांमध्ये त्याच तडफेने भाग घेत राहिले. बाजीरावांनी आपल्या उद्दाम स्वभावामुळे दुखावलेले लोक त्यांनी आपल्या मनमिळावू स्वभावामुळे आपल्याकडे वळवून घेतले. त्याचं उत्तम उदाहरण म्हणजे तासगावचे सरदार रामचंद्र हरी पटवर्धन. बाजीराव उद्दाम तर रामचंद्र हरी तापट.. एकदा बाजीराव दरबारात आल्यावर खडी ताजीम दिली गेली, तेव्हा बाजीरावांनी रामचंद्र हरींकडे बघितलं नाही. या अपमानामुळे रागावलेले रामचंद्र हरी दरबारातून निघून गेले. या बाबतीत चिमाजीआपांनी बाजीरावांना दोन खडे शब्द तर सुनावलेच पण रामचंद्र हरींनाही शांत करून आपल्याकडे घेतलं. घराचे, कुटुंबांचे प्रश्नही चिमाजीच सोडवत असत..मस्तान प्रकरणी राऊ आणि मातोश्री यांच्यामधला तुटलेला संवाद त्यांच्यामार्फत होत असे, बाजीरावांच्या पत्नी काशीबाईची काळजी, घरातील सर्व मुलांवर देखरेख, त्यांची शिक्षणाची सोय, त्यांची मुंज, लग्ने, ह्या जबाबदाऱ्या त्यांनीच सांभाळल्या.

एकट्या चिमाजीआपांच्या नावावर असलेली दुसरी मोठी यशस्वी कामगिरी म्हणजे इ. स. १७२८ मध्ये त्या वर्षाच्या अखेरीला माळव्यात उतरून, २९ नोव्हेंबरला अमझेराच्या लढाईत गिरिधर बहादूर आणि दया बहादूर या दोन बलवान मोगल सुभेदारांवर अचानक हल्ला करून त्यांना पराभूत केलं आणि माळव्याची राजधानी अवंति जिंकली. या त्यांच्या गुप्तपणे झालेल्या विजयामुळे

सारा भारत थक्क झाला. राणोजी शिंदे, उदाजी पवार आणि मल्हारराव होळकरांची तडफदार पराक्रमाची साथ त्यांना मिळाली. ही सारी मोहीम इतक्या गुप्तपणे दोन्ही बंधूंनीही मोहीम आखली की सारा दरबार चकित होऊन गेला.

याचं मुख्य कारण हे होतं की बाजीरावांनी केलेल्या पराभवामुळे, त्यांना कोणीही सरदारांनी मदत करू नये अशी तजवीज चिडलेल्या निजामाने सातारा दरबारात करून ठेवली होती.. म्हणून बाजी-चिमाजींनी, सर्व दरबारींना अंधारात ठेवून त्याचा वचपा  काढला आणि माळवा प्रांत स्वराज्यात आणला. या माळवा प्रांतांच्या कारभाराच्या व्यवस्थेतच माळव्यात इंदूरला होळकर, ग्वाल्हेरात राणोजी शिंदे, आणि धारला पवार कायम झाले.

त्या एप्रिल २८ ते १७ डिसेंबरपर्यंत पेशवे घराण्यातील बाजी-चिमाजी हे २ सूर्यासारखे तेजस्वी, करारी पुत्र, एक सून आणि मस्तान एवढे लोक जग सोडून गेले. मातोश्री राधाबाई आणि बाजीरावांच्या पत्नी काशीबाई, हे वादळ सहन करत राहिल्या. साताराचे छत्रपती, शाहूमहाराज परम दु:खात बुडाले. बाजीरावांच्या मृत्यूची बातमी ऐकून मल्हारराव होळकर तर ८ दिवस जेवलेही नाहीत..राजकारणाचा प्रवाह थोडा काल खंडित झाला आणि परत वाहायला लागला. नवीन गडी, नवीन राज्य सुरू झालं. पेशवेपद श्रीवर्धनच्या भटांच्या घराण्यातच राहिलं. पेशवे बाळाजी विश्वनाथांचा नातू, बाजीरावांच्या पुत्राला, नानासाहेबांना पेशवेपदावर शाहूमहाराजांनी नेमलं..

**वसई म्हणजे चिमाजीआपा हे समीकरण इतिहासात कायम झालं.**

**वसईची लढ्याची छायाचित्रे. –**

१. वसईतील चिमाजीआपांचा पुतळा.
२. वसई किल्ला,
३. अर्नाळा किल्ला.
४. वसईची खाडी.










डॉ. स्मिता दामले.

Email-


suhas.smita48@gmail.com

-------------------------------------------

**ई साहित्य प्रतिष्ठानने प्रकाशित केलेली**

**डॉ. स्मिता दामले यांची इतर 11 पुस्तके**


**ONE** click on cover/ Book will **OPEN**










इतिहासाची
विलग
पाने
डॉ. स्मिता दामले


डॉ. स्मिता दामले


डॉ. स्मिता दामले
एका
ओथमनचा
अंत

डॉ. स्मिता दामले
कलाटणी
CHINA
KUSHAN
SATAVAHANA
EMPIRE
PANDYAN
KINGDOM
CHOLAS


डॉ. स्मिता दामले
असं
घडलं
होतं


डॉ. स्मिता दामले
सल्तनत-ए-दिल्ली




डॉ. स्मिता दामले

मनसोक्त
डॉ. स्मिता दामले

डॉ. स्मिता दामले
सूर्यपुत्र
लोकमान्य

**ई साहित्य प्रतिष्ठानचे हे १६ वे वर्ष.**

**डॉ. स्मिता दामले यांचे हे बारावे पुस्तक.**

डॉ. स्मिता दामले या मध्ययुगीन इतिहासावरील सुप्रसिद्ध विद्वान आहेत. त्यांची मध्ययुगीन इतिहासावर डॉक्ट्रेट झालेली आहे.त्या जरी अमेरिकेत रहात असल्या तरी सातत्याने भारतीय इतिहासाच अभ्यास व लेख त्या करत असतात. आजवर इतिहासात फ़ारशा न चर्चिल्या गेलेल्या भागांवर त्या लिहितात. हल्लीच्या गुगल पंडितांच्या काळात असे मूळ बखरी व दस्त वापरून इतिहास अभ्यासणारे विरळाच. त्याचबरोबर त्यांची इतिहासलेखनाची एक ओघवती शैली आहे. त्यामुळे त्यांचे इतिहासावरचे पुस्तक अत्यंत वाचनीय असते. त्यांची अनेक पुस्तके वाचकांनी अभ्यासली आहेत.

डॉ. दामले यांच्यासारख्या ज्येष्ठ साहित्यिका आपली पुस्तके ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. अजरामर. म्हणून तर दिनानाथ मनोहर(४ पुस्तके), शंभू गणपुले(९पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर(९), डॉ. वसंत बागुल (१९), शुभांगी पासेबंद(१५), अविनाश नगरकर(४), डॉ. स्मिता दामले(९), डॉ. नितीन मोरे (४५), अनील वाकणकर (९), फ्रान्सिस आल्मेडा(२), मधुकर सोनावणे(१२), अनंत पावसकर(४), मधू शिरगांवकर

(८), अशोक कोठारे (४७ खंडांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १८ पुस्तके), विनीता देशपांडे (७) उल्हास हरी जोशी(७), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (१०), डॉ. वृषाली जोशी(४८), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी(६), डॉ. नंदिनी धारगळकर (१५), अंकुश शिंगाडे(३३), आनंद देशपांडे(३), नीलिमा कुलकर्णी (२), अनामिका बोरकर (३), अरुण फडके(६) स्वाती पाचपांडे(२), साहेबराव जवंजाळ (२), अरुण वि. देशपांडे(५), दिगंबर आळशी, प्रा. लक्ष्मण भोळे, अरुंधती बापट(२), अरुण कुळकर्णी(१२), जगदिश खांदेवाले(६) पंकज कोटलवार(६) डॉ. सुरुची नाईक(३) डॉ. वीरेंद्र ताटके(२), आसावरी काकडे(१३), श्याम कुलकर्णी(१८), किशोर कुलकर्णी, रामदास खरे(४), अतुल देशपांडे, लक्ष्मण भोळे, दत्तात्रय भापकर, मुग्धा कर्णिक(४), मंगेश चौधरी, प्र. सु. हिरुरकर(३), बंकटलाल जाजू (३), प्रवीण दवणे, आर्या जोशी, डॉ. सरोज सहस्त्रबुद्धे (७), अरविंद बुधकर (४), जयश्री पटवर्धन(४) श्रीरंग कौलगी, यशवंत कदम(६), पांडुरंग सूर्यवंशी(३) सुधीर कारखानीस, मिलिंद कपाळे मुकुंद कर्णिक (३) असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी, कसलेले लेखक ई साहित्याच्या द्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन

व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं ’इ’यें ।

दृष्टादृष्ट विजयें । होआवे जी ।